पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१८/११/२०२१** वेळ – सकाळी **११.१०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पहिली सभा (विशेष सभा) गुरुवार दिनांक **१८/११/२०२१** रोजी **११.१०** वा. (विधी समितीची निवड प्रक्रिया संपलेनंतर) महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.डॉ.कुणाल खेमनार (भा.प्र.से.)** पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका, व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.सविता बाळकृष्ण खुळे
२. मा.मुंढे उषा अंकुश
३. मा.गायकवाड निर्मला मनोज

या शिवाय मा.उल्हास जगताप –अतिरिक्त आयुक्त (३) तथा नगरसचिव, मा.अजय चारठणकर – उपायुक्त, मा.बोदडे - सहा.आयुक्त, मा.किरण गायकवाड – जनतासंपर्क अधिकारी , हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

| | |
|---|---|
| मा.पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त पुणे महानगरपालिका | – सन्मा. सदस्य,उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.महिला व बाल कल्याण समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी याठिकाणी नेमणूक केलेली आहे. |

मुक्त व निर्भयपणे मा. महिला व बालकल्याण समितीच्या **सभापती** पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देते.**

**मा.नगरसचिव -** मा. महिला व बालकल्याण समितीचे **सभापती** पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका नियम २००७ मधील नियम क्रमांक ३(१) मधील तरतुदीनुसार मा.महिला व बालकल्याण समिती **सभापती** पदाकरीता नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी दिलेल्या मुदतीत एका उमेदवाराचे एक नामनिर्देशन पत्र नगरसचिव यांचेकडे दाखल झालेले आहे .सदरचे नामनिर्देशनपत्र परिपूर्ण असून ते छाननी करणेकामी मा.पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त करण्यात येत आहे.

**मा.पिठासीन अधिकारी तथा -**
**अतिरिक्त आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **सभापती**, महिला व बालकल्याण समिती पदाकरीता एका उमेदवाराचे एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक,अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | **उमेदवाराचे नांव** | **सुचकाचे नांव** | **अनुमोदकाचे नांव** |
|---|---|---|---|
| **०१** | **मा.सविता बाळकृष्ण खुळे.** | **मा.गायकवाड निर्मला मनोज** | **मा.मुंढे उषा अंकुश** |

मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती या पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एका उमेदवाराच्या एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून सदर नामनिर्देशन पत्र परिपूर्ण आहे. त्यावर उमेदवाराचे नाव, पत्ता, प्रभाग क्रमांक नमुद आहे तसेच नामनिर्देशन पत्रावर उमेदवाराची स्वाक्षरी आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशन पत्रावर समितीच्या एका सदस्याने सुचक म्हणून स्वाक्षरी केली आहे आणि दुस-या सदस्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली आहे. सबब सदरचे नामनिर्देशनपत्र वैध असून स्विकृत करण्यात येत आहे.

त्यामध्ये मा.महिला व बालकल्याण समिती **सभापती** पदाची निवडणूक लढविणा-या **मा.सविता बाळकृष्ण खुळे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

## - नामनिर्देशनपत्र माघारी घेणे –

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन अधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी नियमात तरतूद आहे.तथापि एकच वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने उमेदवारी मागे घेण्या विषयी विचारणा करण्यात आली.

## - उमेदवार निवडून आल्याची घोषणा –

एकच वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने उमेदवारी मागे घेण्या विषयी विचारणा करण्यात आली असता उमेदवाराने उमेदवारी मागे घेतलेली नाही. सबब मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.सविता बाळकृष्ण खुळे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

यास्तव **मा.सविता बाळकृष्ण खुळे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे मी डॉ.कुणाल खेमनार(भा.प्र.से.),पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती (विशेष सभा) जाहीर करतो.

----------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १

दिनांक - १८/११/२०२१ विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समिती **सभापती** पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एका नामनिर्देशन पत्रामधील मा.महिला व बालकल्याण समिती **सभापती** पदाची निवडणूक लढविणा-या **मा.सविता बाळकृष्ण खुळे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.सविता बाळकृष्ण खुळे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

--------- **सही/-**

**(डॉ.कुणाल खेमनार( भा.प्र.से.))**
पिठासीन अधिकारी तथा
अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा
महिला व बालकल्याण समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

----------

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५३२/२०२१
दिनांक : १८/११/२०२१



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.